प्रजापत्र
10JUN2023

मस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
शहर सचिव मिलिंद पाळणे, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

जाक्रं.शातंबी/डॉ.पं.दे.व.नि.भ./२०२३/१५४७ दिनांक : १ जून २०२३

# निविदा जाहिरात

## डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थाना वसतिगृह चालविण्यासाठी देणे बाबत.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत बीड येथे शैक्षणिक वर्ष २०२३- २०२४ साठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड येथे चालू करण्यासाठी नोंदणीकृत संस्थाना करारनाम्यानुसार विहीत अटी व शर्तीस अधिन राहून इच्छूक संस्थांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. इच्छूक संस्थांनी आपले अर्ज सदस्य सचिव तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड खंडेश्वरी रोड, बीड यांचेकडे दिनांक १०/०७/२०२३ सा. ०५.०० वा. पुर्वी सादर करावेत. अर्ज करणारी संस्था मुंबई विश्वस्त कायदा १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी. तसेच संस्थेचे किमान ३ वर्षे लेखापरीक्षण झालेले असावे. अर्जाचा नमुना, इतर अटी व शर्तीबाबतची माहिति www.gpbeed.ac.in या संकेतस्थळावर तसेच सदस्य सचिव तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, खंडेश्वरी रोड, बीड यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

| अ.क्र. | निविदा तपशील | निविदापूर्व बैठक | शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | विद्यार्थ्यांची निवास व भोजन व्यवस्था करणे. | दिनांक : १२/०७/२०२३ | २०२३-२०२४ |

**स्वाक्षरित/-**
**सदस्य सचिव तथा प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन, बीड**

**स्वाक्षरित/-**
**मा.अध्यक्ष तथा**
**जिल्हाधिकारी, बीड**

जिमाका/बीड/जाहि/४०/२०२३/२०२४

निविदा शुल्क रु.१०००/- निविदा क्रमांक-

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत**

**नोंदणीकृत संस्थाना वसतिगृह चालण्यिासाठीचे निविदा फॉर्म**

Government Polytechnic Beed

१. अर्जदारा स्वयंसेवी संस्थेचे नांव :-

२. पत्ता :-

३. स्वाक्षरी करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या व्यक्तीचे नाव :-

४. स्वाक्षरी करणाऱ्या सवयंसेवी संस्थेच्या व्यक्तीचे पदनाम :-

५. भ्रमणध्वनी क्रमांक :-

६. स्वाक्षरी आधार कार्ड मं. :-

७. स्वयंसेवी संस्थेचे पॅनकार्ड नं.

८. वसतिगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र (वर्षामध्ये)

९. निविदा भरणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (मुंबई विश्वस्त कायदा १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत)

१०. निविदा भरणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे मागील किमान ३ वर्षे लेखापरीक्षण अहवाल.

११. निविदा भरणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे कार्यकारी समितीवरील अधिकाऱ्यांची पदनिहाय नियुक्ती यादी आणि निविदा स्वाक्षरी करण्यासाठी दिलेले संमतीपत्र.

१२. निविदा भरणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्यावतीने स्वाक्षरी करणाऱ्या वयक्तीचे आधार कार्ड छायांकित प्रत.

१३. शासन निर्णय उच्च व तं.विभाग क्रमांक टीईएम-२०१६/पृ क्र ५०१/तांशि-४ दिनांक १३.११.२०१६, शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहायक विभाग क्रामंक सीबीसी-१०/२०१७/पू.क्र.१९६/मावक्र/दिनांक ४/१०/२०१७, शासन निर्णय उच्च व तंत्र विभाग क्र.संकीर्ण-२०१७/पूक्र./३३२/तांशि-४ दि.७/१०/२०१७, शासन निर्णय, उच्च व तं विभाग-२०१७ पृक्र/४०७/तांशि-४/दिनांक २२/०२/२०१८, शासन निर्णय उच्च व तंत्र विभाग



पान नं.२ वर

क्रमांक संकीर्ण-२०१८/पृक्र १८५/तांशि-४ दि.१८/०६/२०१८/पृक्र २४९/तांशि.-४/ दिनांक १३/०७/२०१८ शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/पृक्र २४९/तांशि-४/दिनांक १०/०८/२०१८, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/पृक्र२४९/तांशि-४/ दि.९/१०/२०१८ मधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१४. लिहुन देणाऱ्यास हे वसतीगृह चालविण्यासाठी कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देण्यात येणार नाही.

१५. वसतीगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या शुल्कामधून वसतीगृहाचा सर्व प्रकारचा खर्च भागविण्याची जबाबदारी लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची राहील.

१६. वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा जसे, वीज, पाणी, खानावळ व्यवस्था, साफसफाईची व्यवस्था, सुरक्षेची व्यवस्था, २०० बेड, २०० टेबल, २०० खुर्ची इत्यादी पुरविण्याची जबाबदारी लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची राहील.

१७. सामाजिक न्याय व विशेष सेवा विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहासाठी विहित करण्यात आलेले निकष/नियमावलीचे लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने तंतोतंत पालन करावे लागेल.

१८. वसतीगृहातील सुविधाबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि सुविधा असमाधानकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास अथवा इमारतीमध्ये गैरकृत्य होत असल्याचे अथवा इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक त्या पुर्वसूचना देऊन लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेशी केलेला करारनामा रद्द करण्याचे अधिकारी मा.जिल्हाधिकारी यांना राहतील.

१९. वसतीगृह चालविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग, कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणे ही जबाबदारी स्वयंसेवी संस्थेची राहील. या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही स्वरुपाचे दायित्व जिल्हाधिकारी अथवा शासन यांचेवर असणार नाही.

२०. वसतीगृहामध्ये प्रवेश प्रक्रिया संदर्भिय शासन निर्णयान्वये किंवा वेळोवेळी सुधारीत केलेल्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येईल.

२१. शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश शासकीय तंत्रनिकेतन बीड, प्राचार्य किंवा त्यांनी आदेशित केलेल्या अधिकारी यांचे मान्यतेनुसार निश्चित करण्याची जबाबदारी लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची राहील.

२२. वसतीगृहामध्ये नियम व अटींचा फलक लावणे आवश्यक आहे.

२३. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आचार संहिता तयार करुन वॉर्डनच्या मदतीने सर्व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावे. हि आचार संहिता सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. याची पूर्ण ज़बाबदारी लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची असेल.

२४. प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी जर एखादा विद्यार्थ्याची लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेविरुध्द/ व्यवस्थापनाविरुध्द तक्रार असेल तर तो विद्यार्थी संबंधित जिल्हाधिकारी तसेच विभागीय सहसंचालक, संचालक तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण यांचेकडे लेखी तक्रार करु शकेल.

२५. वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर अभ्यागतांचा अधिवास अनुज्ञेय राहणार नाही याची दक्षता लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची असेल.

२६. वसतीगृहामध्ये शासकीय तत्रनिकेतन बीड प्राचार्य अथवा त्यांनी आदेशित केलेल्या समितीचे सदस्य वेळोवेळी भेट देऊन योग्य त्या सूचना करतील व त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करुन त्याची अंमलबजावणी करणे लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेवर बंधनकारक असेल.

२७. सदर करारनामा हा करार केल्याच्या दिनांकापासून ०५ वर्षासाठी असेल. निवड केलेल्या संस्थेने वार्षिक भाडयाची रक्कम १०० रु. प्रती महा शासनाकडे जमा करणे आवश्यक राहील.

२८. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड परिसरातील मुलांच्या वस्तीगृहामधील दुसरा व तिसरा मजला वरील मुलांच्या वीज वापराचे बिल भरणा करण्याची जबाबदारी सदरील संस्थेची राहील.

२९. वसतीगृहाच्या पहिल्या सत्राचा सर्वसाधारण कालावधी दिनांक १० जून व ३० नोव्हेंबर व दुसऱ्या सत्राची कालावधी दिनांक १ डिसेंबर ते ३० एप्रिल असा राहील. तथापी अभ्यासक्रमानुसार यामध्ये बदल करता येईल.

३०. लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस शासन निर्णयात निर्दिष्ट केलेल्या शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारता येणार नाही.

३१. लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने सदर वसतीगृह स्वतः चालवावे, इतर कुठल्याही व्यक्तीस अथवा संस्थेस चालविण्यास देऊ नये.

३२. वसतीगृहात अप्रिय तसेच गैरकृत्य झाल्याचे निदर्शनास आल्यास लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेवर योग्य ती कार्यवाही करुन लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

३३. वसतीगहातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे मानसिक व शारिरीक आरोग्य बिघडल्यास योग्य ती खबरदारी घेऊन सदरच्या घटनेची जबाबदारी लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची राहील.

३४. तसेय यापुढे वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके व जिल्हाधिकारी कार्यालय यांचे अध्यादेशांचे पालन लिहुन देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस बंधनकारक राहील.

****